**ग्रामीण / नागरी स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर स्वायत्त संस्था अंतर्गत कार्यालयांची नोंदणी "ग्रास" प्रणालीमध्ये करणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण २०२२/प्र.क्र.४५/कोषा प्रशा-४,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२**
**दिनांक : १७ ऑगस्ट, २०२६.**

**वाचा :** १. वित्त विभाग, अधिसूचना, दि. २१ ऑक्टोबर, २०११
२. वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२२/प्र.क्र.४५/कोषा प्रशा-४, दिनांक २५.०६.२०२६

**प्रस्तावना:-**

राज्य शासनाच्या एकत्रित निधीमध्ये जमा होणाऱ्या १००% महसूली जमा रकमा विनाविलंब, तात्काळ प्रभावाने अन्य कोणत्याही विकल्पाशिवाय केवळ "ग्रास" प्रणालीद्वारेच जमा व्हाव्यात, असा मानदंड महाराष्ट्र शासनाच्या व्हिजन, २०४७ अंतर्गत अधोरेखित आहे. मुख्य लेखाशीर्ष ००२० ते १४७५ या अंतर्गत करांचा भरणा करणे, महाराष्ट्र शासनाच्या सेवा देण्यापोटी आकारण्यात आलेली शुल्क जमा करणे, दिलेल्या कर्जावरील व्याजाचा भरणा करणे, शासन हमीचा भरणा करणे याबाबतची लेखाशीर्षे "ग्रास" प्रणालीवर उपलब्ध आहेत. शासनाच्या क्षेत्रिय कार्यालयांना "ग्रास" प्रणालीवर नोंदणी करण्याची प्रक्रिया आभासी कोषागार कार्यालयामार्फत चालू आहे. संदर्भ क्र.२ नुसार दिनांक १ जुलै, २०२६ नंतर मुख्य लेखाशीर्ष ००२० ते १४७५ अंतर्गत शासकीय जमेचा भरणा "ग्रास" प्रणालीमार्फतच करावयाचा असून पूर्वापार पध्दतीने बँकेच्या माध्यमातून अधिदान व लेखा कार्यालय / जिल्हा कोषागार कार्यालयांमार्फत कोणताही भरणा मॅन्युअल चलनाद्वारे स्वीकारला जाणार नाही.

यापुढे ग्रामीण / नागरी स्थानिक स्वराज्य संस्था (महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायत) आणि इतर स्वायत्त संस्था (मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, आयोग, विद्यापीठे, इ.) नी देखील शासन जमा करावयाचा रकमांचा भरणा "ग्रास" प्रणालीमार्फतच करणे आवश्यक ठरते.

ज्या कार्यालयांना आहरण व संवितरण अधिकारी सांकेतांक प्राप्त झालेला नाही, अशा ग्रामीण / नागरी स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर स्वायत्त संस्था यांचेमार्फत देखील शासनाच्या

एकत्रित निधीमध्ये शासकीय महसूलाचा भरणा चलनाद्वारे केला जातो. तरी सदर कार्यालयांना देखील "ग्रास" प्रणालीवर नोंदणी करून संबंधित महसूलाचा भरणा "ग्रास" प्रणालीद्वारे शासन खाती जमा करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :

मुख्य लेखाशीर्ष ००२० ते १४७५ या अंतर्गत करांचा भरणा करणे, महाराष्ट्र शासनाच्या सेवा देण्यापोटी आकारण्यात आलेली शुल्क जमा करणे, दिलेल्या कर्जावरील व्याजाचा भरणा करणे, शासन हमीचा भरणा करणे याबाबतची लेखाशीर्षे "ग्रास" प्रणालीवर उपलब्ध आहेत. सबब, सदर लेखाशीर्षे वापरणाऱ्या सर्व ग्रामीण / नागरी स्थानिक स्वराज्य संस्था (महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायत) आणि इतर स्वायत्त संस्था (मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, आयोग, विद्यापीठे, इ.) अंतर्गत कार्यालयांनी सदर भरणा GRAS प्रणालीमार्फतच करावा. दिनांक ०१ सप्टेंबर, २०२६ नंतर या लेखाशीर्षांतर्गत बँकेच्या माध्यमातून अधिदान व लेखा कार्यालय / जिल्हा कोषागारांमार्फत कोणताही भरणा स्वीकारला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

"ग्रास" प्रणालीवर ग्रामीण / नागरी स्थानिक स्वराज्य संस्था (महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायत) आणि इतर स्वायत्त संस्था (मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, आयोग, विद्यापीठे, इ.) अंतर्गत कार्यालयांची नोंदणी प्रक्रिया सोबतच्या परिशिष्टात नमूद केली आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०२६०८१७१२५८१०९७०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by RAVIKUMAR BALAJIRAO LINGANWAD
Date: 2026.08.17 12:59:07 +05'30'

**( रविकुमार लिंगनवाड )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत-**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव / प्रधान सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव / प्रधान सचिव / अपर मुख्य सचिव

३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव / प्रधान सचिव.
४. सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
६. सर्व मा. विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य.
७. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या अधिनस्त असलेले सर्व विभाग प्रमुख / प्रादेशिक कार्यालय प्रमुख / कार्यालय प्रमुख
८. प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
९. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)- १, महाराष्ट्र, मुंबई
१०.प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
११.महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१२.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
१३.आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई
१४.आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन, नागपूर
१५.प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई
१६.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१७.सचिव, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई
१८. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१९. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई
२०.मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२१.विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली
२२.सर्व विभागीय आयुक्त
२३.सर्व जिल्हाधिकारी
२४.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२५.संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई
२६.अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई
२७.संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकणभवन, नवी मुंबई
२८. सहसंचालक, लेखा व कोषागारे, कोकण/पुणे/नाशिक/ छत्रपती संभाजी नगर/अमरावती/नागपूर
२९.सह संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकण/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजी नगर /अमरावती/नागपूर
३०.अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
३१.वित्त विभागातील सर्व कार्यासने
३२.निवड नस्ती/कोषा प्रशा-४

## शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण २०२२/प्र.क्र.४५/कोषा प्रशा-४, दि. १७ ऑगस्ट, २०२६ सोबतचे परिशिष्ट

## "ग्रास" प्रणालीवर ग्रामीण / नागरी स्थानिक स्वराज्य संस्था (महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायत) आणि इतर स्वायत्त संस्था (मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, आयोग, विद्यापीठे, इ.) अंतर्गत कार्यालयांची नोंदणी प्रक्रिया

"ग्रास" प्रणालीवर ज्या कार्यालयांना आहरण व संवितरण अधिकारी सांकेतांक प्राप्त झालेला नाही अशा ग्रामीण / नागरी स्थानिक स्वराज्य संस्था (महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायत) आणि इतर स्वायत्त संस्था (मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, आयोग, विद्यापीठे, इ.) अंतर्गत कार्यालयांची नोंदणी करावयासाठी विहीत केलेले नमुने "ग्रास" प्रणालीचे संकेतस्थळ http://gras.mahakosh.gov.in/echallan/#tab३ वरील download link या टॅबवर Formats for Office Addition in GRAS या नावाने उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. "ग्रास" प्रणालीवर नोंदणी न झालेली ग्रामीण / नागरी स्थानिक स्वराज्य संस्था (महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायत) आणि इतर स्वायत्त संस्था (मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, आयोग, विद्यापीठे, इ.) अंतर्गत कार्यालये यांनी नोंदणीबाबतचे नमुने दि. ३१ ऑगस्ट, २०२६ पूर्वी आभासी कोषागार कार्यालयास प्राप्त होतील, याची दक्षता घ्यावी.

ग्रामीण / नागरी स्थानिक स्वराज्य संस्था (महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायत) आणि इतर स्वायत्त संस्था (मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, आयोग, विद्यापीठे, इ.) अंतर्गत कार्यालयांची "ग्रास" प्रणालीवर नोंदणी करुन घेण्याकरिता संबंधित कार्यालयांमधील अधिकाऱ्याची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात यावी.

"ग्रास" प्रणालीवर नोंदणी करण्यासाठी अवलंबावयाची कार्यपध्दती पुढीलप्रमाणे आहे.

अ) **एकल कार्यालयांची नोंदणी (थेट प्रशासकीय विभागांतर्गत असलेली स्वायत्त संस्था)**
एकल कार्यालयांनी "ग्रास" प्रणालीवर नोंदणी करण्यासाठी उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या विहीत नमुन्यामध्ये माहिती भरुन आभासी कोषागार कार्यालय, मुंबई कार्यालयाकडे थेट पाठवावी.

आ) **स्वायत्त संस्थांच्या अधिनस्त कार्यालयांची नोंदणी**
स्वायत्त संस्थांच्या अधिनस्त कार्यालये असल्यास व त्यांच्याकडून रकमा शासन जमा करण्यात येत असल्यास अशा कार्यालयांनी "ग्रास" प्रणालीवर नोंदणी करण्यासाठी उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या विहीत नमुन्यामध्ये माहिती भरुन स्वायत्त संस्थेच्या मुख्य कार्यालयास पाठवावी. सदर मुख्य कार्यालयाने माहितीची पडताळणी

करुन ती योग्य असल्याची खात्री करावी. योग्य असलेले नोंदणीबाबतचे नमुने आभासी कोषागार कार्यालय, मुंबई कार्यालयाकडे पाठवावे.

पडताळणी अंती अंतिम झालेले नोंदणीबाबतचे नमुने आभासी कोषागार कार्यालयाच्या इमेल आयडी vtodat.mum-mh@gov.in वर पाठवावेत. तसेच "ग्रास" प्रणालीतील नोंदणीबाबत विचारणा करावयाची असल्यास "ग्रास" प्रणालीचे वेब पेज वर मदत कक्षाचे संपर्क क्रमांक उपलब्ध आहेत. त्यावर संबंधित कार्यालयांना आभासी कोषागार कार्यालयासोबत संपर्क करता येउ शकेल.

अचूक माहिती असलेले नमुने आभासी कोषागार कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर त्या माहितीचे आधारे सदर कार्यालयांची नोंदणी आभासी कोषागार कार्यालयाकडून करण्यात येईल. नोंदणी झालेल्या कार्यालयांचे लॉग-इन आयडी व पासवर्ड आभासी कोषागार कार्यालयाकडून उपलब्ध करुन देण्यात येतील.

*****